गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी-गोवा

वार्तापत्र

## मुख्यमंत्र्याहस्ते सचिवालयात स्वातंत्र्य सैनिकांच्या तसबिरींचे अनावरण

ता. 18 जून 2019

28 ज्येष्ठ 1941

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते आज सचिवालयात स्वातंत्र्यसैनिक डॉ. राम मनोहर लोहिया, पुरूषोत्तम काकोडकर, बाळा राया मापारी, टी.बी.कुन्हा, विश्वनाथ नारायण लवंदे आणि शाबू बबन नाईक देसाई यांच्या तसबिरीचे अनावरण करण्यात आले.

स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या जीवनाचा त्याग करून गोवा पोर्तुगीजांच्या सत्तेतून मुक्त केले. आम्ही त्यांच्या त्यागाचे स्मरण केले पाहिजे आणि प्रशासनात क्रांतीपर्व घडेल याची अपेक्षा बाळगली पाहिजे. आम्ही लोकसेवक असून सामान्य लोकांना चांगली सेवा देण्यास बांधील आहोत. सरकारी कर्मचा-यांनी समर्पित वृत्तीने काम केले पाहिजे. प्रशासन सुरळीत चालविण्यासाठी आम्ही एकमेकांना सहकार्य केले पाहिजे असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

यावेळी सरकारी सचिव, अधिकारी आणि कर्मचारी हजर होते.

मा/वाप/एनजी/जॉआ/रना/सुसुका/2019/345